म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा. वा.
दा. क्र. : १८७७

१८७७

# महाभारत

IRBK-0101977
IRBK-0101977

वि. द. पिंदरकर




म. ग्रं. सं. ठाणे
विषय
नं.

# सुलभ महाभारत

## भाग सहावा

म. ग्रं. सं. ठाणे.

लेखक

विठ्ठल दत्तात्रेय चिंदरकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. .......... नों. दि ..........
वि. .......... क्र. ..........

IRBK-0101977
IRBK-0101977

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४

'सुलभ महाभारत' या ग्रंथमालेचा हा सहावा भाग असून मूळ व्यासकृत महाभारतांतील पुढील कथा यांत घेतल्या आहेत.


| | | |
|---|---|---|
| १ | परशुरामचरित्र | ३ |
| २ | सुकन्या | ४ |
| ३ | मांधाता | ७ |
| ४ | सोमकाचा पुत्रहोम | ९ |
| ५ | शिबी राजाची सत्वपरीक्षा | ९ |
| ६ | बालपंडित अष्टावक्र | ११ |
| ७ | बंदीचा पराजय | १४ |
| ८ | दोन मित्र | १८ |
| ९ | सुगंधी कमळ | २३ |
| १० | भीम आणि सर्प | २६ |
| ११ | महापुरांत मनु | २८ |
| १२ | दुर्योधनाची फजीति | ३१ |
| १३ | दुर्वासभोजन | ३४ |
| १४ | द्रौपदीहरण | ३८ |


किंमत ८ आणे


प्रथमावृत्ति १९४५



सर्वाधिकार प्रकाशकाधीन



प्रकाशक—शंकर वामन कुळकर्णी, महाराष्ट्रग्रंथभांडार, मुंबई नं. ४
मुद्रक:—मि. विल्यम कूपर, 'न्यू जॅक् प्रिं. वर्क्स' लि., भायखळा मुंबई

## परशुरामचरित्र

धर्मराज आपल्या परिवारासह महेंद्र पर्वतावर आला. तेथें त्याची परशुरामाशीं भेट झाली. या ठिकाणीं धर्माला परशुरामाचें चरित्र ऐकायला मिळालें.

परशुरामाचा बाप जमदग्नि ऋषि. या ऋषीनें प्रसेनजित राजाची कन्या रेणुका हिच्याशीं विवाह केला होता. त्याला रेणुकेपासून पांच मुलगे झाले. परशुराम हा सर्वांत धाकटा. एकदां रेणुका नदीवर स्नान करीत असतां तेथें जवळच चित्ररथ नांवाचा राजा आपल्या स्त्रियांसह क्रीडा करीत असलेला तिच्या दृष्टीस पडला. चित्ररथाला पाहून तिच्या मनांत मोह उत्पन्न झाला. ती आश्रमांत परत आली ती राजाचें चिंतन करीतच. जमदग्नीनें तिच्या मनांतील चलबिचल ओळखली. त्याला तिचा अतिशय राग आला. आपल्या मुलांना बोलावून आणून त्यानें तिला ठार करण्यास त्यांना सांगितलें ! पण रामाखेरीज कुणीही तें घोर कृत्य करायला तयार होईना. परशुरामानें एक कुऱ्हाड घेऊन आपल्या आईचा वध केला ! त्यामुळें जमदग्नि त्याच्यावर खूष झाला. त्यानें परशुरामाला वर माग म्हणून सांगितलें. परशुरामानें आपली आई जिवंत व्हावी आणि तिला तिचा वध केल्याची स्मृति राहूं नये, असा वर मागून घेतला. जमदग्नीच्या कृपेनें रेणुका जिवंत झाली. तिला झालेल्या प्रकाराची कसलीच आठवण राहिली नाहीं.

पुढें कार्तवीर्य नांवाचा राजा एकदां जमदग्नीच्या आश्रमांत येऊन उन्मत्तपणानें वागूं लागला. परशुरामाला त्याचा राग येऊन त्यानें धनुष्यबाण घेऊन त्याचा वध केला. कार्त-

वीर्याच्या मुलांनीं या कृत्याचा सूड घेण्याचें ठरविलें. परशुराम आश्रमांतून बाहेर गेला आहे अशी संधि पाहून त्यांनीं जमदग्नीला ठार केलें. परशुराम बाहेरून जेव्हां आला तेव्हां त्याला आपल्या पित्याचा वध झालेला दिसला. त्याला सर्व प्रकार कळला तेव्हां तो फारच रागावला. त्यानें सर्व क्षत्रियांचा संहार करण्याचें ठरविलें. त्यानें एकवीस वेळां क्षत्रियांचा संहार करून आपला राग शमविला.

महेंद्र पर्वतावरून निघून पांडव प्रभास तीर्थावर आले. तेथें धर्मानें मोठी तपश्चर्या केली. तेथें कृष्ण, बलराम वगैरे यादव त्यांना येऊन भेटले. तेथें कौरवांचा पाडाव कसा करायचा याबद्दल यादवांनीं विचार केला.

---

## सुकन्या

नर्मदा नदीच्या कांठीं पांडव आले तेव्हां त्यांना लोमश मुनीनें सुकन्या आणि च्यवनऋषि यांचें चरित्र सांगितलें. च्यवन हा भृगु मुनींचा पुत्र. तो एका सरोवराच्या कांठीं वनांत तपश्चर्या करीत बसला होता. कांहीं वर्षांनीं त्याच्या अंगाभोवतीं वारूळ वाढलें. फक्त डोळ्यांचीं दोन भोकें तेवढीं दिसत होतीं. एकदां शर्याति नांवाचा राजा आपल्या परिवारासह येऊन त्या सरोवरांत विहार करूं लागला. राजाला सुकन्या नांवाची एक सुंदर मुलगी होती. ती फिरत फिरत च्यवनाच्या वारूळाजवळ आली. वारूळामधील लुकलुकणारे ते च्यवनाचे दोन डोळे पाहून तिला मौज वाटली. आंत च्यवन तपश्चर्या करीत आहे हें तिला माहित नव्हतें. तिनें अजाणतां ते डोळे कांट्यानें खुपसले.

त्यामुळें च्यवनाचे डोळे रक्तबंबाळ झाले. त्याबरोबर तो ऋषि रागावला. त्याच्या रागामुळें शर्याति राजाच्या परिवारांत एका-



एकीं आजार सुरू झाला. च्यवन ऋषीला कुणीतरी उपद्रव केल्यामुळें असें घडलें, हें राजाला समजलें. त्यानें चौकशी केली. आपल्या सुकन्येकडून न कळत अपराध घडला आहे हें पाहून राजा तिला घेऊन च्यवनाकडे गेला. त्यानें च्यवनाची क्षमा मागितली. च्यवन म्हणाला, " तुझी ही कन्या मला दे म्हणजे माझा राग शांत होईल." राजानें लगेच त्याची इच्छा पुरी केली. सुकन्या च्यवनाची बायको झाली. राजानें च्यवनाला आपल्या घरीं नेऊन त्याचा सत्कार केला. नंतर च्यवन सुकन्येसह अरण्यांत आपल्या आश्रमांत राहूं लागला.

एकदां सुकन्या स्नान करून आश्रमांत परत येत असतां देवांचे वैद्य जे अश्विनीकुमार ते तिच्या लावण्यानें मोहित

झाले. ते तिच्याजवळ येऊन तिची स्तुति करूं लागले. ते म्हणाले, "च्यवन हा म्हातारा. तूं तर सुंदर आणि तरुण. त्याला सोडून दे आणि आमच्यापैकीं एकाशीं विवाह कर. तुला सुंदर वस्त्रें आणि अलंकार देऊं."

"छे! हें भलतेंच काय बोलतां?" सुकन्या रागावून म्हणाली, "च्यवनाखेरीज कुणाही अन्य पुरुषावर माझें मन जाणार नाहीं. तो म्हातारा असला तरी तो माझा पति आहे."

ती वळत नाहीं असें पाहून अश्विनीकुमार म्हणाले, "च्यवनाला आम्ही आमच्या सारखाच तरुण करतों. मग तूं आम्हा तिघांपैकीं एकाला वर. वाटल्यास च्यवनाला जाऊन विचार."

सुकन्या देवांचा निरोप घेऊन च्यवनाकडे गेली. अश्विनीकुमारांचें म्हणणें तिनें त्याला सांगितलें. च्यवनानें विचार केला कीं तरुण होण्याची ही संधि चांगली आहे. पुढचें पुढें पाहूं. त्यानें अश्विनीकुमारांच्या म्हणण्याला संमति दिली.

अश्विनीकुमार च्यवनासह सरोवरांत उतरले. पाण्यांतून वर आल्यावर ते तिघेही अत्यंत सुंदर, तरुण आणि एकाच रूपाचे दिसूं लागले. प्रत्येक जण सुकन्येला आपणास वर असें सांगूं लागला. सुकन्या विचारांत पडली. काय करावें तें तिला सुचेना. तिनें प्रत्येकाच्या खाणाखुणा नीट न्याहाळून पाहिल्या. प्रत्येकाचें बोलणें नीट ऐकलें आणि कांहीं विशिष्ट खुणा जमतांच तिनें आपल्या पतीला ओळखलें. च्यवनालाच तिनें आपला पति म्हणून निवडलें. अश्विनीकुमारही सुकन्येच्या चातुर्यानें खूष झाले आणि तेथून निघून गेले.

आपला म्हातारा जांवई तरुण झाला आहे हें ऐकून शर्याति राजा त्याला भेटायला आला. तरुण जांवयाला पाहून त्याला मोठा संतोष वाटला. च्यवनानें या वेळीं असा विचार केला कीं, अश्विनीकुमारांच्या कृपेमुळें आपणाला तारुण्याचा लाभ झाला आहे. तेव्हां त्यांचें कांहींतरी प्रिय केलें पाहिजे. अश्विनीकुमार हे देवांचे वैद्य असले तरी त्यांना यज्ञांत सोमपान करण्याचा अधिकार नव्हता. हा अधिकार त्यांना मिळवून देण्याचें च्यवनानें ठरविलें. त्यानें शर्याति राजाला यज्ञ करण्यास सांगितलें.

यज्ञांत च्यवनानें अश्विनीकुमारांना पाचारण केलें. इंद्राला जेव्हां ही हकीकत समजली तेव्हां त्यानें यज्ञांत विघ्न आणण्याचें ठरविलें. तो च्यवनाकडे जाऊन म्हणाला, “ तूं अश्विनीकुमारांसाठीं सोमरस ग्रहण करशील तर माझ्या वज्रानें तुझा नाश करीन. ”

च्यवनानें त्याचें म्हणणें ऐकलें नाहीं. त्यानें सोमरस ग्रहण केला. तेव्हां इंद्र वज्र घेऊन धांवला. तेव्हां इंद्राचा प्रतिकार करण्यासाठीं च्यवनानें एक महाभयंकर अशी कृत्या निर्माण केली. ती इंद्रावर धांवली. तेव्हां इंद्र घाबरला आणि च्यवनाला शरण आला. त्यानें अश्विनीकुमारांचा अधिकार मान्य केला.

---

## मांधाता

वाटेंत धर्मानें मांधाता आणि सोमक राजांची हकीकत विचारली. लोमशानें ती त्याला निवेदन केली. ती अशीः

इक्ष्वाकुवंशांत युवनाश्व नांवाचा एक राजा पुत्रप्राप्ती-साठीं वनांत तप करीत होता. एकदां त्याला फार तहान लागली. पाण्याच्या शोधांत तो भृगु ऋषीच्या आश्रमांत येऊन दाखल झाला. भृगुपुत्रानें त्याच दिवशीं राजाला पुत्र व्हावा म्हणून यज्ञ केला होता. त्यासाठीं अभिमंत्रित पाण्याचा कलश ठेवून दिला होता. त्या कलशांतील पाणी युवनाश्वाच्या राणीनें प्राशन केलें असतां तिला पुत्र होणार होता. युवनाश्व भृगूच्या आश्रमांत आला त्या वेळीं रात्र झाली होती आणि सर्वजण झोंपले होते. राजानें पाण्यासाठीं खूप हांका मारल्या. पण कोणी जागे झाले नाहींत. तेव्हां त्यानें वेदीवर ठेवलेल्या कलशांतील पाणी पिऊन टाकलें. सकाळीं ऋषिवर्ग पाहातात तों कलश रिकामा आहे ! चौकशी करतां तें पाणी राजानें पिऊन टाकलें आहे असें समजलें. ऋषींनीं राजाला सांगितलें, " आतां तुझ्या ठिकाणींच पुत्रजन्म होईल. त्यापासून तुझ्या प्राणांस धोका पोंचणार नाहीं अशी व्यवस्था आम्ही करूं. " पुढें शंभर वर्षांनीं राजाच्या डाव्या बरगडींतून महातेजस्वी असा पुत्र बाहेर आला. राजाच्या जिवाला कांहींच अपाय झाला नाहीं. हा चमत्कार पाहाण्यासाठीं इंद्रही तेथें आला. आतां हा मुलगा खाणार काय अशी विंवचना सर्वांना पडली. तेव्हां मुलाच्या तोंडांत आपली तर्जनी घालून इंद्र म्हणाला, " हा मला प्राशन करील (मामधाता) " इंद्राची तर्जनी चोखून तो मुलगा एकदम तेरा वितीं वाढला ! त्या वेळेपासून त्याचें नांव 'मांधाता' असें पडलें. हा राजा मोठा पराक्रमी आणि धार्मिक निघाला. त्यानें पुष्कळ यज्ञ केले.

## सोमकाचा पुत्रहोम

सोमक राजाला शंभर बायका होत्या. पण त्याला वृद्धावस्थेंत एकच पुत्र झाला. त्याचें नांव जंतु. एकदां जतूला एक मुंगी चावली. त्याबरोबर तो रडूं लागला. त्याबरोबर त्याच्या शंभर माताही घाबऱ्या होऊन रडूं लागल्या. राजाला जेव्हां रडण्याचें कारण कळलें तेव्हां त्याला वाईट वाटलें. आपणाला आणखी पुत्र असावे असें त्याला वाटूं लागलें. त्यानें आपल्या पुरोहिताला पुत्रप्राप्तीचा मार्ग विचारला. पुरोहितानें सांगितलें, " जंतूचा यज्ञांत होम करून त्याचा धूर जर शंभर स्त्रियांनीं अवघ्राण केला तर तुला शंभर पुत्र होतील. जंतु पुनः आपल्या मातेच्या उदरीं जन्म घेईल. त्याच्या बरगडीला सोन्यासारखा डाग दिसेल. "

राजानें लगेच यज्ञाची तयारी केली. जंतूच्या शंभर माता त्याला होमांत सोडायला तयार होईनात. तेव्हां पुरोहितानें ओढून त्याला होमांत टाकलें. शंभर मातांनीं खूप आक्रोश केला. होमांतील धुरानें आणि शोकानें त्या मूर्च्छित पडल्या. पुढें त्या शंभर स्त्रियांना गर्भ राहून त्यांना मुलगे झाले. जंतुही पुनः जन्माला आला. त्याच्या बरगडीजवळ सोन्यासारखा डाग दिसत होता.

## शिबी राजाची सत्त्वपरीक्षा

जला आणि उपजला नदींच्या तीरावर यज्ञ करून मोठी कीर्ति मिळविलेल्या शिबी राजाची कथा लोमशानें पांडवांना पुढें सांगितली.

एकदां शिबी राजाच्या थोरपणाची परीक्षा पाहाण्याचें इंद्रानें ठरविलें. इंद्रानें ससाण्याचें आणि अग्नीनें कवड्याचें रूप घेतलें. ससाणा कवड्याच्या मागें लागला. घाबरलेला कवडा आश्रयासाठीं शिबी राजाच्या मांडीवर येऊन बसला. ससाणाही तेथें आला. तो राजाला म्हणाला, "कवडा हें माझें भक्ष्य आहे. तें माझें मला दे."



"शरण आलेल्याला अभय देणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. तेव्हां कवडा तुला मिळणार नाहीं." राजानें उत्तर दिलं.

"राजा, मी भुकेलेला आहें." ससाणा म्हणाला.

"मग तुला वाटेल तें खायला देतों. वाटेल त्याचें मांस मिळेल."

म. ग्रं. सं. आ.

"छे! छे! कवडा हेंच ससाण्याचें भक्ष्य आहे. तेंच मला मिळालें पाहिजे." ससाणा म्हणाला.

"मीं या कवड्याला आश्रय दिला आहे. तो तुला मिळणार नाहीं. दुसरें कांहीं वाटेल तें तूं माग."

"मग, राजा, तुझें मांस मला दे. एका पारड्यांत कवड्याला घालून त्याच्या वजना इतकें तुझें मांस मला दे. म्हणजे मी निघून जाईन."

"बरें आहे!" असें म्हणून शिबी राजानें एक तराजू आणला. त्यानें एका पारड्यांत कवड्याला ठेवून दुसऱ्या पारड्यांत आपल्या अंगचें मांस तोडून तो घालूं लागला. पण कवड्याचेंच पारडें खालीं राहूं लागलें. शेवटीं राजा स्वतः पारड्यांत जाऊन बसला. तरीही पारडें वर येईना!

तेव्हां इंद्र आणि अग्नि स्वतः प्रकट झाले. त्यांनीं राजाच्या थोर अंतःकरणाची खूप स्तुति करून त्याला आशीर्वाद देऊन ते निघून गेले.

---

## बालपंडित अष्टावक्र

पांडवांना वाटेंत उद्दालकाचा पुत्र श्वेतकेतु याचा आश्रम लागला. उद्दालकाचा कहोड नांवाचा एक शिष्य होता. त्याचें अध्ययन पुरें झाल्यावर गुरूनें आपली सुजाता नांवाची कन्या त्याला अर्पण केली. या सुजातेच्या पोटीं कहोडाला अष्टावक्र नांवाचा मुलगा झाला. आईच्या पोटांत असतांच हा सर्व विद्या ऐकून शिकला. कहोड रोज अध्ययन करीत असे. एकदां पोटांत

असतांच त्यानें आपल्या बापाची कांहीं चुकी नजरेला आणून त्याचा उपहास केला. तेव्हां रागावून कहोडानें त्याला शाप दिला, 'तूं जन्मतांच आठ ठिकाणीं वांकडा होशील.' त्याप्रमाणें तो जन्म पावतांच आठ ठिकाणीं वांकडा झाला आणि त्याचें अष्टावक्र असें नांव पडलें. सुजाता दहाव्या महिन्याची गरोदर असतां ती कहोडाला म्हणाली, "आतां प्रसूतीचा काळ जवळ आला आहे. घरांत तर मुळीं द्रव्य नाहीं. आपण द्रव्य आणण्याची व्यवस्था करावी."

बायकोच्या सांगण्याप्रमाणें कहोड द्रव्य आणण्यासाठीं बाहेर पडला. जनकराजापाशीं जाऊन त्यानें आपणास द्रव्य द्यावें अशी याचना केली. त्या वेळीं जनकाच्या पदरीं असलेल्या वादविवाद करणाऱ्या बंदीनें त्याचा वादविवादांत पराजय करून त्याला पाण्यांत बुडविलें. उद्दालकाला ही हकीकत समजली तेव्हां त्यानें ती गुप्त ठेवण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें अष्टावक्र जन्माला आला आणि मोठा झाला तरी त्याला आपल्या बापाविषयीं कांहींच माहिती नव्हती. तो उद्दालकालाच आपला पिता समजत होता.

बाराव्या वर्षी एकदां अष्टावक्र उद्दालकाच्या मांडीवर निजला असतां उद्दालकाचा मुलगा श्वेतुकेतु तेथें आला आणि त्यानें अष्टावक्राला तेथून उठविलें आणि "ही मांडी माझ्या बापाची आहे—तुझ्या बापाची नव्हे!" असें सांगितलें. त्यामुळें मानी अष्टावक्र रडूं लागला. त्यानें आकांत करून आपला बाप कोठें आहे असें आईला विचारलें. तेव्हां मोठ्या नाइलाजानें आईला सर्व हकीकत सांगावी लागली. ती हकीकत

ऐकून त्या बालपंडिताला अतिशय दुःख झालें. आपला समवयस्क मामा श्वेतकेतु याला तो रात्री म्हणाला, “ या गोष्टीचा सूड उगविला पाहिजे. आपण जनकराजाच्या यज्ञाला जाऊं. त्या बंदीचा जुळल्यास पराजयही करूं. ” भाच्याची मसलत मामाला मानवली. ते दोघे जनकराजाच्या यज्ञमंडपाकडे जाण्यास निघाले.

यज्ञमंडपांत प्रवेश होणें सामान्य काम नव्हतें. वृद्ध, विद्वान् अशा ब्राह्मणांचाच तेथें प्रवेश होत असे. तिथें या चिमुरड्या पोरांना कोण विचारतो ? तेथील द्वारपालानें त्यांना आंत सोडण्याचें नाकारलें. अष्टावक्रानें खूप सांगून पाहिलें तरीही तो द्वारपाल ऐकेना.

अष्टावक्र म्हणाला, “ शहाणपणा आणि विद्वत्ता वयावर अवलंबून नसतात. पुष्कळ वेळां पिकलेल्या केंसांच्या वृद्धापेक्षां काळ्या केंसाचा बालकच ज्ञानी असतो. आम्हांला जनकराजाच्या बंदीचा वादविवादांत पराजय करायचा आहे तरी कृपा करून तूं आम्हांला आंत जाऊं दे. मी लहान दिसत असलों तरी खात्रीनें त्या बंदीचा पराभव करीन. माझ्या महत्त्वाकांक्षेच्या आड तूं येऊं नकोस. ”

इतक्यांत खुद्द जनकराजाच तेथें आला. राजाला अष्टावक्रानें यज्ञमंडपांत जाण्याची इच्छा दाखविली. जनकाला त्या बालपंडितांचें कौतुक वाटलें. त्यांची परीक्षा घेण्याचें त्यानें ठरविलें.

जनकानें विचारलें, “ ज्याचे बारा अंश असून त्या प्रत्येक अंशाचे तीस तीस भाग आहेत व ज्याला चोवीस पर्वें असून

तीनशें साठ आरा आहेत असें काय तें माहीत आहे का? ज्ञानी पुरुषाखेरीज इतरांना हें सांगतां येणार नाहीं."

अष्टावक्र : ज्याला पौर्णिमा अमावास्यारूपी चोवीस पर्वें असून ऋतुरूपी सहा नाभि (तुंबे), मासरूपी बारा धावा आणि दिवस रूपी तीनशें साठ आरा आहेत असें तें सदोदित चालू असलेलें संवत्सररुपी चक्र तुझें संरक्षण करो.

राजा : झोंपी गेल्यावरही कोणाचे डोळे मिटत नाहींत? जन्म पावल्या नंतरही ज्यामध्यें हालचाल नसते असें काय आहे? हृदय कोणाला नाहीं? आणि वेगानें काय वाढत असतें?

अष्टावक्र : झोंपी गेल्यानंतरही माशाचे डोळे मिटत नाहींत. अंडें उत्पन्न झालें तरीही त्यामध्यें हालचाल नसते. दगडाला हृदय नसतें तरी वेगानें वाढत असतो.

राजा : तुझ्या उत्तरानें मी संतुष्ट झालों आहे. माझ्या यज्ञमंडपांत प्रवेश करून तूं बंदीचा वादविवादांत पराजय कर.

## बंदीचा पराजय

अष्टावक्र आणि श्वेतकेतु यांचा अशा रीतीनें आंत प्रवेश तर झाला. अष्टावक्रानें आंत गेल्यावर बंदीला वादविवादाचें आव्हान दिलें आणि थोड्याच वेळांत दोघांचें वाग्युद्ध सुरू झालें.

बंदी : अग्नि एकच असला तरी तो अनेक रूपांनीं प्रकट होत असतो. सूर्य एकच असला तरी सर्व जगाला तोच प्रकाश देतो. इंद्र एकच आहे. तसा पितरांचा अधिपति यमही एकच आहे.

अष्टावक्र : इंद्र आणि अग्नि हे दोघे मित्र संचार करीत

असतात. नारद आणि पर्वत हे दोघे देवर्षि आहेत. अश्विनीकुमार दोन आहेत. रथाचीं चाकें दोन असतात. पति आणि पत्नी हीं दोघें असतात.




बंदी : कर्में तीन प्रकारचीं आहेत. तीन वेदांच्या योगानें वाजपेय यज्ञ होतो. अध्वर्यु तीन वेळां स्नान करतात. लोक तीन आहेत. तेजही तीन प्रकारचें असतें असें म्हणतात.

अष्टावक्र : आश्रम चार आहेत. यज्ञ करणारे वर्ण चार आहेत. वाणीचे पाद सूक्ष्म, पश्यंती, मध्यमा, वैखरी असे चार आहेत. श्लोकाचे चरण चार असतात.

बंदी : गार्हपत्य, दक्षिणाग्नि, आहवनीय, सभ्य आणि अवसथ्य असे पांच अग्नि आहेत. पंक्ति छंदाला आठआठ अक्षरांचा एक असे पांच चरण आहेत. महायज्ञ पांच आहेत—दर्श, पौर्णिमास्य, चातुर्मास्य, पशु आणि सोम. इंद्रियेंही पांच आहेत. वेदांमध्यें पंचचूडा नांवाची एक अप्सरा सांगितली आहे. पंचनद नांवाचें प्रसिद्ध तीर्थ आहे.

अष्टावक्र : धेनु, भूमि, सुवर्ण, रौप्य, वस्त्र आणि अश्व अशा सहा दक्षिणा सांगितल्या आहेत. कालचक्र सहा ऋतूंचें बनलेलें आहे. मनासहित इंद्रियें सहा आहेत. कृत्तिकेच्या तारा सहा आहेत.

बंदी : ग्राम्य पशु सात आहेत. वन्य पशुही सातच आहेत. यज्ञकर्म सात प्रकारच्या छंदांनीं चालतें. ऋषि सात आहेत. आराधनेचे प्रकार सात आहेत. स्वर सात प्रकारचे आहेत. वीण्याच्या तारा सात असतात.

अष्टावक्र : शतमान नांवाचें वजन आठ शाणां ( एक प्रकारचें वजन ) इतकें असतें. सिंहाला ठार करणाऱ्या शरभाला आठ पाय असतात. वसु आठ आहेत. यज्ञयूपाला आठ कोन असतात.

बंदी : अग्नि प्रदीप्त करणाऱ्या मंत्रांची संख्या नऊ आहे. दानकर्माला देश, काल, आगम, द्रव्य, पात्र, दाता, योग्य प्रकारचे गुण, विधि आणि मंत्र या नवांचा योग असावा लागतो. बृहती छंदाचीं अक्षरें नऊ आहेत. नवांचा पाढा प्रसिद्धच आहे.❀

---

टीप १७ पानावर पहा

अष्टावक्र : मानलेल्या दिशा मिळून एकंदर दहा आहेत. दहा शेंकडे म्हणजे एक हजार संख्या. गर्भ दहा महिने पोटांत असतो.

बंदी : स्वर्गांतील रुद्र अकरा आहेत. यज्ञांत यूपमंत्र अकरा आहेत.

अष्टावक्र : वर्षाचे महिने बारा. जगती छंदाच्या चरणाचीं अक्षरें बारा. यज्ञाचे दिवसही बारा. आदित्य बारा आहेत.

बंदी : त्रयोदशी ही तिथि प्रशस्त आहे. पृथ्वीचीं द्वीपें तेरा आहेत.

एवढें बोलून बंदी थांबला. त्याला पुढचें कांहीं सुचेना. तेव्हां अष्टावक्रानें त्याचें बोलणें पुरे केलें. तो म्हणाला, " केशी दैत्यानें तेरा दिवस युद्ध केलें. अति जगती छंदाचीं अक्षरें तेरा आहेत."

पुढें कांहीं बोलतां न आल्यामुळें बंदी लाजला. त्यानें शरमेनें खालीं मान घातली. त्याचा पराभव झाला. सर्वांनीं बालपंडित अष्टावक्र याचा जयजयकार केला. अष्टावक्र म्हणाला, " या बंदीनें आतांपर्यंत पुष्कळ ब्राह्मणांना वादविवादांत हरवून पाण्यांत बुडविलें आहे. आतां याचीही स्थिति तीच केली पाहिजे. याला आधीं पाण्यांत बुडवा पाहूं."

---

* नवांनीं भागलें असतां बाकी शून्य राहाते अशा संख्येचा पाढा मांडावा. त्यांतील प्रत्येक संख्येची बेरीज निरनिराळी केली तरी नऊच येते. उदा० १८, २७, यांतील प्रत्येकाची बेरीज ९ च येईल. तसेंच शून्यापासून एक दोन तीन असे नवांपर्यंत सरळ आंकडे मांडावे आणि त्यावर पुनः नऊपासून शून्यापर्यंत उलट आंकडे मांडीत जावे कीं नवाचा पाढा तयार होतो.

बंदी म्हणाला, " त्यांना मीं बुडविलेलें नाहीं. वरुणाच्या घरीं बारा वर्षांनीं संपणारा यज्ञ चालला होता. तिकडे त्या ब्राह्मणांना मीं पाठविलें आहे. ते आतां परत येतील. "

इतक्यांत वरुणाच्या घरीं यज्ञाला गेलेले ब्राह्मण परत आले. त्यांत अष्टावक्राचा पिता कहोडही होता. अष्टावक्र आपल्या पित्याला घेऊन आपल्या आश्रमांत परत आला.

आपल्या विद्वान् मुलाला पाहून कहोडाला आनंद वाटला. त्याचें शरीर आपल्याच शापामुळें वांकडें झालें ही गोष्ट त्या प्रेमळ पित्याच्या मनाला लागून राहिली. त्यानें आपल्या मुलाचें कल्याण करण्याचें ठरविलें. समंगा नदीमध्यें स्नान करून येण्यास त्यानें अष्टावक्राला सांगितलें. त्यानें तसें करतांच त्याच्या शरीराचा वांकडेपणा जाऊन तें सरळ झालें.

---

## दोन मित्र

पूर्वीं भरद्वाज आणि रैभ्य असे दोन मुनि होऊन गेले. ते दोघे मित्र होते. ते मोठ्या गुण्यागोविंदानें शेजारीं शेजारीं राहात होते. भरद्वाज हा मोठा तपस्वी होता. रैभ्य विद्वान् असून सगळ्या वेदांचें त्यानें अध्ययन केलें होतें. रैभ्याचे पुत्रही विद्वान् असून ब्राह्मण त्यांना फार मान देत असत. भरद्वाज नुसता तपस्वीच असल्यामुळें त्याची ब्राह्मणांत तेवढीशी बोलवा नव्हती. ही गोष्ट त्याचा मुलगा यवक्रीत याच्या मनाला फार लागून राहिली होती. रैभ्य आणि त्याचे मुलगे यांच्या प्रमाणेंच आपणालाही विद्वानांत मान मिळावा अशी त्याची इच्छा होती. आतां वेदाध्ययन करून नांव मिळविण्यास पुष्कळ काळ लागेल,

म्हणून झटपट विद्वान् होण्याच्या मार्गाला तो लागला.

त्यानें वेदांचें ज्ञान होण्यासाठीं मोठें तप आरंभलें. त्याच्या तपानें संतुष्ट होऊन इंद्रानें त्याला दर्शन दिलें. आपणाला सर्व वेदांचें ज्ञान व्हावें असा यवक्रीतानें वर मागितला. तेव्हां इंद्र त्याला म्हणाला, “ तूं दुसरा कसला तरी वर माग. कारण अध्ययन केल्याशिवाय वेदांची प्राप्ति होणार नाहीं. तूं कुणाला तरी गुरु करून वेदांचा अभ्यास कर. ”

पण यवक्रीताला इंद्राचें म्हणणें मानवलें नाहीं. तो पुनः अघोर तप करीत राहिला. तेव्हां इंद्रानें त्याचें मन वळविण्याचा निराळाच मार्ग आरंभला. गंगेच्या कांठीं एका वृद्ध ब्राह्मणाचें



रूप घेऊन इंद्र गेला आणि नदींत पसापसा वाळू फेकूं लागला. यवक्रीतानें त्याला विचारलें. " हें तूं काय चालविलें आहेस ? "

ब्राह्मण म्हणाला, " गंगेला मी सेतु बांधीत आहें. सेतूमुळें लोकांना अलिकडून पलिकडे जाण्यास त्रास होणार नाहीं. "

यवक्रीत हंसून म्हणाला," वाळूचा का कधीं सेतु बांधून होणार आहे ? "

ब्राह्मण म्हणाला, " आणि तुला अध्ययनाशिवाय का वेदांची स्फूर्ति होणार आहे ? "

यवक्रीतानें ओळखलें कीं हा इंद्र आहे. तो इंद्राला म्हणाला, " मीं जो एकदां निश्चय केला आहे तो कायम. मग काय वाटेल तें होवो. "

तो आपल्या निश्चयापासून ढळत नाहीं असें पाहून इंद्रानें त्याला वेदांची स्फूर्ति होईल असा वर दिला.

यवक्रीत लगेच आपल्या पित्याकडे आला आणि आपणास वेदांची प्राप्ति झाली असें त्यानें सांगितलें.

त्याचा पिता भरद्वाज समंजस होता. श्रमाशिवाय वेद मिळाल्यामुळें आपला मुलगा उन्मत्त होईल आणि मोठमोठ्या ब्राह्मणांचा अपमान करील अशी त्याला भीति वाटली. तो यवक्रीताला म्हणाला, " अध्ययनाशिवाय तुला विद्या प्राप्त झाली आहे तेव्हां तूं गर्वानें फुगून जाऊन नाश पावशील अशी मला भीति वाटते. तरी तूं असें कांहीं करूं नकोस. तसेंच विद्वान् रैभ्याच्या तूं वाऱ्यालाही उभा राहूं नकोस. "

'मी चांगल्या रीतीनें वागेन' असें पित्याला वचन देऊन

यवक्रीत रैभ्याकडे जाण्यास निघाला. पण विद्येचा त्याला गर्व व्हायचा तो झालाच. तो मोठमोठ्या विद्वानांना तुच्छ लेखूं लागला. फिरत फिरत तो आपल्या ज्ञानाचा दिमाख दाखवूं लागला.

एकदां असाच फिरत असतां तो रैभ्याच्या आश्रमांत आला. आश्रमांत रैभ्य किंवा त्याचे मुलगे नव्हते. आश्रमाच्या बागेंत रैभ्याची सून फिरत होती. तिचें अनुपम लावण्य पाहून यवक्रीत तिच्यावर मोहित झाला. त्यानें तिच्याकडे प्रेमयाचना केली. तिनें त्याचा निषेध केला. पण तिच्या निषेधाला न जुमानतां त्यानें तिच्यावर बलात्कार केला.

रैभ्य आश्रमांत परत आला तेव्हां आपली सून रडत आहे असें त्याच्या दृष्टीला पडलें. त्यानें प्रेमळपणें तिची विचार-पूस केली. सुनेनें घडलेली सर्व हकीकत सासऱ्याला सांगितली. तेव्हां त्या म्हाताऱ्याला राग येऊन त्यानें यवक्रीताचा नाश करण्याचें ठरविलें. त्यानें आपली एक जटा उपटून तीपासून एक सुंदर स्त्री आणि एक राक्षस निर्माण केला. त्यांना यवक्रीताचा वध करण्यास त्यानें सांगितलें.

ती सुंदर स्त्री यवक्रीताकडे गेली. तो तिच्यावर भुलला. तिनें त्याच्या हातचा कमंडलु मोठ्या युक्तीनें काढून घेतला आणि ती पळत सुटली. तसेंच तो राक्षस शूळ घेऊन त्याच्या-वर धांवला. यवक्रीत घाबरून पळत सुटला आणि आपल्या आश्रमाकडे आला. पण तेथें त्याला राक्षसानें गांठून शूलानें ठार केलें.

आपल्या पुत्राचा वध झाला आहे असें पाहून भरद्वाज शोक करूं लागला. त्यानें रैभ्याला रागाच्या भरांत शाप दिला कीं तुझा तुझ्या पुत्राकडून वध होईल. भरद्वाजानें पुत्रशोकानें अग्निप्रवेश केला.

भरद्वाजाचा शाप एके दिवशीं खराच ठरला. रैभ्याचा मुलगा परावसु हा रात्रींच्या वेळीं आश्रमांत परत येत असतां त्याला अरण्यांत कांहींतरी हरणासारखें दिसलें. वास्तविक रैभ्यमुनिच हरणासन पांघरून तेथें फिरत होते. परावसूनें तें हरण समजून त्याला ठार केलें. पुढें त्याला आपली चूक कळून आली.

त्या वेळीं बृहद्युम्न राजाच्या यज्ञांत परावसु आणि त्याचा भाऊ अर्वावसु हे यज्ञकर्म करीत होते. पित्याचा वध झाल्यानंतर परावसु आपल्या बंधूकडे गेला. न कळत आपल्या हातून पित्याचा वध झाला ही हकीकत त्यानें बंधूला सांगितली. अर्वावसूनें त्याला यज्ञाच्या कामाला बसविलें आणि आपण त्याच्या पापाचें क्षालन होण्यासाठीं तप करण्यासाठीं गेला.

कांहीं दिवसांनीं तपाचरण पुरें करून अर्वावसु परत आला. तो येत आहे असें पाहून त्याचा लबाड भाऊ परावसु राजाला म्हणाला, "त्या पित्याचा वध करणाऱ्या पाप्याला आंत घेऊं नका. त्याला घालवून द्या. त्याच्या दर्शनानेंही तुला त्रास होईल."

राजानें आपल्या सेवकांकडून अर्वावसूला घालवून दिलें. आपण आपल्या पित्याचा वध केला नसून परावसूनें केला असें त्यानें खूप सांगून पाहिलें. पण त्याचें कोणी ऐकलें नाहीं. शेवटीं कंटाळून तो अरण्यांत निघून गेला. तेथें तो तप करूं लागला.

त्याच्या तपानें सूर्य त्याच्यावर प्रसन्न झाला. सूर्यापासून अर्वावसूनें वर मागून घेतले. त्यामुळें त्याचा पिता रैभ्य, यवक्रीत, भरद्वाज हे जिवंत झाले. यापुढें कोणीही अध्ययनावांचून विद्या प्राप्त करून घेऊं नये असा वर अर्वावसूनें मागून घेतला. दोन मित्रांच्या कुटुंबांत जें वैर निर्माण होऊन त्यांचा नाश झाला होता तें वैर अशा रीतीनें मिटलें. आणि पुनः तीं दोन कुटुंबें सुखी झालीं.

## सुगंधी कमळ

पांडव गंधमादन पर्वताकडे प्रवास करीत चालले असतां वाटेंत त्यांनीं एका स्थळीं मुकाम केला. तेथें द्रौपदी एकटीच



बसली असतां वाऱ्यानें उडून आलेलें एक अतिशय सुवासिक असें कमळ तिच्या दृष्टीस पडलें. तें कमळ इतर कमळांहून फारच निराळें आणि सुंदर होतें. अशीं पुष्कळशीं कमळें आपणास मिळतील तर बरें होईल असें तिला वाटलें. तिनें भीमाला तें कमळ दाखवून असें सांगितलें, " यासारखीं आणखीं कमळें घेऊन ये. मला हें कमळ फार आवडलें आहे."

आपल्या प्रिय पत्नीची हौस पुरविण्यासाठीं भीम लगेच तेथून निघाला. ज्या दिशेनें कमळ येऊन पडलें त्या बाजूनें भीम जाऊं लागला. भीम सारखा चालत होता. तो गंधमादन पर्वता-वर कमळाचा शोध करूं लागला.

वाटेंत मारुति बसला होता. भीमानें कांहीं त्याला ओळ-खलें नाहीं. कुणीतरी वानर असेल असें त्याला वाटलें. भीम मारुतीला म्हणाला, " रे वानरा, तूं वाटेंतून बाजूला हो. नाहीं तर शेपटीला धरून तुला आपटून टाकीन."

मारुतीनें भीमाला ओळखलें. पण ओळख दाखविली नाहीं. भीमाला फार गर्व झाला आहे. आपल्यासारखा बलवान् कोणी नाहीं असें त्याला वाटत आहे, हें मारुतीनें ओळखलें. त्याचा गर्वहरण करण्याचें मारुतीनें ठरविलें. तो भीमाला म्हणाला, " मी तर हा असा म्हातारा. माझ्यानें उठवत नाहीं. तूं माझें शेपूट उचलून बाजूला ठेव आणि पुढें जा."

भीमानें विचार केला, या उर्मट वानराचें शेपूट धरून त्याला चांगला आपटून मारावा. तो शेपूट उचलण्यासाठीं वांकला. त्यानें शेपटीला हात घालून ती ओढली. पण ती तसूभरही जागची हालली नाहीं ! त्यानें आपलें सर्व बळ एकवटून शेपटी

उचलण्याचा प्रयत्न केला. पण शेपटी त्याला कांहीं केल्या उच-



लेना. तेव्हां भीम लाजला. तो मनांत समजला कीं हा कांहीं साधा वानर नाहीं—कुणीतरी वेषधारी देव असावा. मारुतीकडे जाऊन त्याला नमस्कार करून भीम म्हणाला, "तूं कोण आहेस तें सांग. मी तुला शरण आलों आहें. माझ्या बळाचा गर्व तूं हरण केलास."

मारुतीनें हंसून त्याला आपली ओळख दिली. भीमानें त्याला भक्तिभावानें नमस्कार केला. नंतर भीमाच्या इच्छेवरून मारुतीनें आपलें रामायणकालीन स्वरूप दाखविलें. मारुतीनें भीमाला मग सौगंधिक कमळें असलेल्या सरोवराकडे जाण्याचा मार्ग दाखविला.

भीम मारुतीनें दाखविलेल्या मार्गानें गेला तो एका सुंदर

सरोवरापाशीं येऊन दाखल झाला. तें सरोवर कमळांनीं भरलेलें असून कुबेराचें होतें. त्यावर संरक्षणासाठीं राक्षस ठेवले होते. त्यांच्याबरोबर युद्ध करून भीमाला कमळें तोडावीं लागलीं. भीमानें कितीतरी कमळें तोडून घेतलीं. कुबेरानेंही भीमाला कमळें तोडल्याबद्दल अडथळा केला नाहीं.

इकडे भीम बराच वेळ झाला तरी परत येत नाहीं असें पाहून धर्म काळजी करूं लागला. त्यानें भीमाचा शोध करण्यास जाण्याचें ठरविलें. भीमाचा राक्षसपुत्र घटोत्कच त्यांच्याजवळ नुकताच आला होता. त्यानें सर्व पांडवांना आणि इतर राक्षसांनीं धर्माजवळच्या ब्राह्मणांना खांद्यावर वाहून नेलें. ही सर्व मंडळी कुबेराच्या सरोवराजवळ आली. भीमाला पाहून त्यांना आनंद झाला. द्रौपदी सुगंधी कमळें पाहून आनंदली. तेथें कुबेराची आणि पांडवांची भेट झाली. कुबेरानें पांडवांचा खूप सत्कार केला.

पांडव मग गंधमादन पर्वतावरच अर्जुनाची वाट पहात राहिले.

---

## भीम आणि सर्प

गंधमादन पर्वतावर धर्माला अर्जुनाची भेट झाली. अनेक प्रकारचीं अस्त्रें, अभेद्य कवच, देवदत्त शंख वगैरे बहुमोल देणग्या घेऊन अर्जुन आपल्या प्रियजनांच्या भेटीस आला. त्यानें मोठ्या प्रेमानें सर्वांच्या भेटी घेतल्या. स्वर्गामधील आपली हकीकत निवेदन केली. आतां मनुष्यलोकीं अर्जुनासारखा कोणीही पराक्रमी पुरुष नाहीं असा इंद्राच्या तोंडचा उद्गार ऐकून धर्माला आपल्या बंधूविषयीं मोठा अभिमान वाटला. नंतर पांडव द्वैत-

वनामध्यें राहाण्यास गेले. या वेळीं एका महाभयंकर अशा भुजं-
गानें भीमाला आपल्या शेपटीनें बांधून टाकलें. त्यापासून



भीमाला आपली सुटका करून घेतां येईना. हा कुणीतरी शाप-
भ्रष्ट पुरुष सर्पाच्या योनींत असावा असें त्याच्या शक्तीवरून
भीमाला वाटलें. भीमानें त्याची स्तुति करून त्याला, 'तूं कोण
आहेस' असें विचारलें. पूर्वी नहुष नांवाचा एक पराक्रमी राजा
होऊन गेला. त्याची पालखी वाहायला हजार ब्राह्मण लागत.
ब्राह्मणांच्या या अपमानामुळें अगस्त्यमुनीनें त्याला शाप दिला.
त्यामुळें तो सर्प होऊन पडला. त्यानें अगस्त्यमुनीची क्षमा

मागितली. तेव्हां ‘ जो विवेकी पुरुष तुझ्या प्रश्नांचीं उत्तरें देईल तो तुझा उद्धार करील ’ असा त्याला उःशाप मिळाला. सर्पानें भीमाला आपली अशी हकीकत सांगितली. तेव्हां भीम काय करावें याचा विचार करूं लागला.

इकडे बाहेर गेलेला भीम परत कां येत नाहीं म्हणून इतर पांडव काळजी करूं लागले. धर्म धौम्याला घेऊन भीमाच्या शोधासाठीं बाहेर पडला. फिरतां फिरतां ते जेथें भीमाला सर्पानें पकडून ठेवलें होतें तेथें आले. आपला बंधु आला आहे हें पाहून भीमाला आनंद झाला. त्यानें सर्पाची सर्व हकीकत धर्माला निवेदन केली आणि त्या सर्पाच्या प्रश्नांचीं उत्तरें दिल्यास आपला उद्धार होईल असेंही सांगितलें. धर्मानें सर्पाच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची तयारी दाखविली. तेव्हां सर्पानें ब्राह्मण कोणास म्हणावें, ज्ञेय असें काय आहे, अशासारखे अनेक प्रश्न धर्माला विचारून धर्माबरोबर बराच वेळ चर्चा केली. धर्माच्या उत्तरांनीं सर्प संतुष्ट झाला. त्यानें भीमाला सोडून दिलें. सर्पाचा उद्धार होऊन तो नहुष राजाच्या रूपानें स्वर्गाला गेला.

---

## महापुरांत मनु

पुढें पांडव द्वैतवनामधून काम्यकवनांत राहायला गेले. तेथें कृष्ण येऊन त्यांना भेटला. मार्कंडेय मुनिही तेथें आले. या मुनीनें पांडवांना मनूचें चरित्र सांगितलें.

मनु हा सूर्याचा पुत्र. मनूनें खूप मोठी तपश्चर्या करून आपलें सामर्थ्य वाढविलें होतें. चीरिणी नदीच्या तीरावर तो एकदां तपश्चर्या करीत असतां एक मासा तीराजवळ येऊन

मनूला म्हणाला, " मनु, मी एक चिमुकला मासा आहें. मोठे मासे मला नेहमीं त्रास देत असतात. ते मला केव्हां खाऊन टाकतील याचा नेम नाहीं."

मनु कळवळून म्हणाला, " मग मी तुझ्यासाठीं काय करूं ? "

मासा म्हणाला, " तूं मला वर काढ आणि एकाद्या लहानशा भांड्यांत ठेव. म्हणजे मोठ्या माशांपासून मी वांचेन."

मनूनें त्याच्या सांगण्याप्रमाणें केलें. त्यानें लहान माशाला आपल्या ओंजळींत घेतलें आणि घरीं एका पाण्यानें भरलेल्या रांजणांत ठेवलें. त्या रांजणांत मासा वाढूं लागला. कांहीं दिवसांनीं त्याला तो रांजण पुरेना इतका मासा मोठा झाला. तेव्हां मासा मनूला म्हणाला, " मनु, हा रांजण मला अपुरा पडतो. तरी मला मोठ्या जागेंत ठेव."

मनूनें माशाला विहिरींत नेऊन सोडलें. विहिरींत मासा वाढूं लागला. कांहीं दिवसांनीं तो इतका मोठा वाढला कीं त्याला विहीरही अपुरी पडूं लागली. त्यानें पुनः मनूला सांगितलें, " मला गंगा नदींत नेऊन सोड. तेथें मी वाढेन."

मनूनें माशाला गंगा नदींत नेऊन सोडलें.

नदीचें पात्रही माशाला कांहीं दिवसांनीं अपुरें पडूं लागलें, इतका तो वाढला. तेव्हां मनूनें त्याला समुद्रांत नेऊन सोडलें. त्या वेळीं मासा मनूला बोलला, " मनु, आतां लवकरच जगबुडी येणार आहे. ही पृथ्वी त्यांत बुडून जाईल. तूं त्या वेळीं एक नौका तयार करून तिला दोरी बांधून तयार ठेव. त्या

नौकेंत सर्व प्रकारचीं धान्यें असूं देत. त्या नौकेंत बसून तूं माझें स्मरण कर म्हणजे मी तेथें येईन. माझ्या डोक्यावर शिंग दिसेल त्यानें तुला माझी ओळख पटेल. होडीची दोरी तूं शिंगाला बांध म्हणजे मी तुला सुरक्षित ठिकाणीं घेऊन जाईन."

मनूनें तसें करण्याचें कबूल केलें आणि मासा निघून गेला.

पुढें कांहीं वर्षांनीं खरोखरच मोठा पूर आला. सगळी पृथ्वी जलमय होऊन गेली. मनूनें होडी तयार करून ठेवलीच होती. पूर येतांच तो होडींत बसून राहिला. होडी पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगूं लागली. मनूनें लागलीच त्या माशाचें स्मरण केलें. तेव्हां मासा पाण्यांतून भराभरा मार्ग कापीत आला. मनूनें त्याला ओळखलें. कारण त्याच्या डोकीवर एक भलें मोठें शिंग होतें.



मनूनें माशाच्या शिंगाला दोरी बांधली आणि मासा होडी ओढत नेऊं लागला. पुष्कळ पोहत पोहत मासा हिमालयाच्या शिखराकडे आला. त्या वेळीं पाणी इतकें वाढलें होतें कीं हिमालय पर्वतही बुडून गेला होता. फक्त त्याच्या शिखराचीं लहान टोकें काय तीं थोडीं दिसत होतीं.

एका शिखराकडे येतांच मासा मनूला म्हणाला, " आणखी कांहीं वेळानें पाणी ओसरूं लागेल. माझ्या शिंगाची दोरी सोड आणि ती या शिखराला बांधून ठेव. " मनूनें त्याप्रमाणें केलें.

त्यानंतर मासा मनूला म्हणाला, " मी ब्रह्मा आहें. जगबुडीपासून जगाला वांचविण्यासाठीं तुला मीं येथें आणला आहे. आतां पाणी ओसरल्यावर तूं पृथ्वीवर राहा आणि निरनिराळे प्राणी उत्पन्न कर. " असें म्हणून मासा नाहींसा झाला.

कांहीं दिवसांनीं पाणी ओसरून गेलें आहे असें पाहून मनु पृथ्वीवर आला. त्यानें पुनः पृथ्वीवर निरनिराळे प्राणी आणि वनस्पति निर्माण केल्या.

---

## दुर्योधनाची फजिती

पांडव वनवासाला गेले तरी त्यांच्याविषयीं कौरवांच्या मनांतून दुष्ट बुद्धि नाहींशी झाली नव्हती. द्वैतवनांत जाऊन पांडवांचा नाश करावा, त्यांना आपलें वैभव दाखवून खिजवावें असा कौरव विचार करूं लागले. पण पांडव ज्या ठिकाणीं राहात होते त्या द्वैतवनांत जायचें कसें असा त्यांना विचार पडला. शेवटीं त्यांनीं विचार करून एक युक्ति ठरविली. द्वैत-

वनाच्या बाजूला गौळीवाडे होते. त्या गवळीवाड्यांत जाऊन आपल्या गोधनाची मोजदाद करण्याचें त्यांनीं ठरविलें. धृत-राष्ट्रानें या कामासाठीं तिकडे जाण्यास दुर्योधनाला संमति दिली. दुर्योधन आपले बंधु, कर्ण वगैरेंना घेऊन सैन्यासह गौळीवाड्यांत गेला. गौळीवाड्यांत जाऊन त्यांनीं गाई आणि त्यांचीं वासरें यांची मोजदाद केली आणि पुढें काय करावें याचा ते विचार करूं लागले.

पांडव राहात असलेल्या द्वैतवनांत एक सुंदर सरोवर होतें. या सरोवराच्या कांठीं जाऊन विहार करावा आणि पांडवांना खिजवावें असें त्यांनीं ठरविलें. ते तिकडे जायला निघाले. पण वाटेंत चित्ररथ गंधर्वाच्या लोकांनीं त्यांना अडविलें. पांडवांची फजिती करण्यासाठीं कौरव अरण्यांत चालले आहेत हें वृत्त इंद्राला कळलें होतें. तेव्हां कौरवांना पकडून आणण्यासाठीं इंद्रानें चित्ररथाला पाठविलें. चित्ररथाच्या सैन्यानें कौरव सैन्याची दाणादाण उडवून दिली. त्यांनीं दुर्योधनादि कौरवांना आणि त्यांच्या स्त्रियांना पकडून ठेवलें.

दुर्योधनाला पकडलें तेव्हां कांहीं कौरवसैन्य पांडवांकडे पळून गेलें. त्यांनीं कौरवांना चित्ररथानें पकडल्याचें वृत्त सांगि-तलें. कौरवांना पकडल्याचें ऐकून भीमाला बरें वाटलें. त्यांची चांगली खोड मोडली असें त्यास वाटलें. पण धर्माला हें कांहीं आवडलें नाहीं. तो भीमाला म्हणाला, " कसें झालें तरी कौरव हे आपले बंधु आहेत. त्यांना कोणीं उपद्रव दिला तर आपण त्याचें शासन केलें पाहिजे. त्यांना सोडवून आणणें हें आपलें कर्तव्य आहे. आज ते अडचणींत आहेत. अडचणींत सांपडलेल्या

बांधवांना कधीं अंतर देऊं नये. त्यांना तुम्ही सत्वर जाऊन सोडवून आणा. ''

धर्माच्या बोलण्यामुळें भीमाला कांहीं बोलतां येईना. अर्जुन लगेच सज्ज होऊन आपल्या बंधूंसह गंधर्वांचा समाचार घेण्यासाठीं निघाला. त्यानें गंधर्वांशीं मोठें युद्ध केलें. अर्जुन आपणाशीं युद्ध करीत आहे हें पाहून चित्ररथ गंधर्वानें शस्त्र खालीं ठेवलें. इंद्राच्या आज्ञेवरून आपण कौरवांना पकडून नेत आहों असें त्यानें अर्जुनाला सांगितलें आणि अर्जुनाचा कौरवांना सोडण्याचा आग्रह पाहून त्यानें कौरवांना मुक्त केलें.

पांडवांमुळें आपला पाणउतारा झाला हें पाहून कौरव शरमेनें मेल्यासारखे झाले. त्यांनीं पांडवांच्या डोळ्याला डोळा



मिडविण्याचें धाडस केलें नाहीं. धर्मानें दुर्योधनाला उपदेश करून जाण्यास आज्ञा दिली.

त्या दिवसापासून दुर्योधनाचें चित्त उडालें. त्याचें कशावरही लक्ष लागेना. त्यानें प्रायोपवेशन करण्याचें ठरविलें. कर्ण, शकुनी, त्याचे बंधु यांनीं त्याचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तो आसन मांडून बसला. वल्कलें नेसून आणि दर्भासनावर बसून तो तप करूं लागला. पण कर्णानें अर्जुनाचा नाश करीन अशी प्रतिज्ञा केल्यावर तो परत आपल्या नगरांत आला.

दुर्योधन परत आल्यावर त्यानें वैष्णवयज्ञ केला.

---

## दुर्वासभोजन

द्वैतवनामध्यें पांडव असतां त्या अरण्यांतील हरणें आणि इतर पशु पांडवांच्या शिकारीला बळी पडूं लागले. त्यामुळें त्यांची संख्या कमी होऊं लागली. ही गोष्ट धर्माच्या लक्षांत येतांच त्यानें द्वैतवन सोडून काम्यकवनांत जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें धर्मराज आपल्या परिवारासह काम्यकवनांत निघून गेला. याच ठिकाणीं दुर्वास ऋषि आपल्या हजारों शिष्यांसह पांडवांकडे भोजन करण्याच्या इच्छेनें आला.

नुकताच दुर्योधनाचा पाहुणचार घेऊन दुर्वास ऋषि तृप्त झाला होता. त्यानें दुर्योधनाला वर माग असें सांगितलें. दुर्योधनानें पांडवांची सत्त्वपरीक्षा करावी असा वर मागून घेतला. सूर्यापासून नेहमी अन्न देणारी एक थाळी पांडवांना मिळाली होती. पांडवांना भोजन घालून द्रौपदीचें भोजन होईपर्यंत या

थाळीमधून वाटेल तितकें अन्न येत असे. म्हणून द्रौपदीचें भोजन झाल्यावर दुर्वास ऋषि पांडवांकडे भोजनासाठीं गेला. त्याच्या बरोबर त्याचे हजारों शिष्यही होते.

पांडवांनीं त्यांचा सत्कार करून स्नान करून भोजनासाठीं येण्यास सांगितलें.

इकडे द्रौपदी मोठ्या फिकीरींत पडली. आतां इतक्या माणसांना अन्न कुठून घालायचें हा प्रश्न तिच्यापुढें येऊन उभा राहिला. ती अगदीं रडकुंडीला आली. आतां तो कोपिष्ठ मुनि येईल आणि अन्न नाहीं असें पाहून आपणाला शाप देईल याची तिला भीति वाटूं लागली. ती गडबडली. तिनें अगतिक होऊन कृष्णाचा धांवा आरंभला. वस्त्रहरणाच्या प्रसंगीं जशी आपली लाज रक्षण केलीस तशी याही प्रसंगीं राख अशी तिनें कृष्णाची मनोमय प्रार्थना केली.

कृष्ण तिच्या प्रार्थनेला पावला. तो तिच्यापुढें प्रकट झाला. द्रौपदीला एक मोठें संकट दूर झाल्यासारखें वाटलें. कृष्ण द्रौपदीला म्हणाला, "तुझी हांक ऐकून मी इतक्या लांबून धांवत आलों आहें. तरी मला आधीं जेवायला वाढ."

"कृष्णा, तूंही माझी थट्टा करतोस का रे ?"

"थट्टा नाहीं. खरेंच मला भूक लागली आहे."

"घरांत एक दाणाही नाहीं आणि हजारों ब्राह्मणांना अन्न वाढायचें आहे."

"तुझी ती सूर्यथाळी तर आण खरी. त्यांत कांहीं असलें तर मला दे."

" त्यांत कांहीं नाहीं. हवी तर पहा." द्रौपदीनें थाळी आणून कृष्णाला दाखविली.

कृष्णानें पाहिलें भाजीचें एक बारिकसें पान थाळीला



चिकटून राहिलें आहें. त्यानें तें पान आवडीनें खाल्लें आणि तृप्तीचा ढेंकर दिला. कृष्ण मोठ्या संतोषानें द्रौपदीला म्हणाला, " वा ! पोट कसें भरून गेलें या भाजीच्या पानानें."

द्रौपदीला त्यामुळें लाजल्यासारखें झालें. एवढा मोठा कृष्ण आपला पाठिराखा पण त्याला खायला द्यायला मिळूं नये याचें तिला वाईट वाटलें.

कृष्णानें द्रौपदीला सांगितलें, " त्या ब्राह्मणांना आतां जेवायला बोलाव. मीं सारी व्यवस्था केली आहे. तूं काळजी करूं नको !"

स्नानास गेलेले दुर्वासप्रभृति ब्राह्मण ज्या वेळीं पाण्यांतून बाहेर आले तेव्हां त्यांना असें वाटलें कीं आपलें पोट भरलें आहे. जिभेला जेवणानंतरची रुचि आलेली आहे. ते एकमेकांना



म्हणूं लागले, "आतां पांडवांकडे जाऊन जेवणार काय आपण? आपलें पोट तर भरून गेल्यासारखें वाटत आहे."

दुर्वास म्हणाला, "खरेंच. पोट गच्च भरलें. भूक तर मुळींच नाहीं. आतां कसें करावें? मला वाटतें आपण इथूनच पळून जावें हें उत्तम. नाहीतर ते श्रेष्ठ पांडव स्वयंपाक फुकट घालविल्याबद्दल आपणाला शाप देतील."

ते सर्व ब्राह्मण पांडवांचा निरोपही न घेतां तेथून पळून गेले!

इकडे त्यांना जेवायला बोलविण्यासाठीं नकुळसहदेव

नदीकिनारीं आले. पण ब्राह्मण कुठें होते ? ते केव्हांच निघून गेले होते !

## द्रौपदीहरण

एकदां पांडव द्रौपदीला एकटीच आश्रमांत ठेवून शिकारीला गेले. धौम्य आणि इतर कांहीं ब्राह्मण काय ते आश्रमांत होते. या वेळीं सिंध देशाचा राजपुत्र जयद्रथ आपणाला योग्य वधू पाहाण्यासाठीं बराच मोठा लवाजमा घेऊन त्या वाटेनें चालला होता. त्याच्या दृष्टीला आश्रमाच्या दारांत उभी असलेली द्रौपदी पडली. तिचें अवर्णनीय रूप पाहून तो चकीतच झाला. ती कोण



असावी हें त्याला कळेना. तिची चौकशी करण्यासाठीं त्यानें आपल्या एका मित्राला पाठविलें. तो मित्र परत येऊन सांगूं लागला कीं ती पांडवांची पत्नी द्रौपदी आहे. तिचे पति शिकार करण्यासाठीं चार दिशांना गेले आहेत. आश्रमांत दोन ब्राह्मणां-शिवाय कोणीच नाहीं. जयद्रथाला तें ऐकून बरें वाटलें. तो द्रौपदीकडे जाऊन तिला म्हणाला, " तुझे पति राज्यहीन झाले आहेत. अशा भिकारी पतींबरोबर वनवास भोगत राहाण्यापेक्षां तूं मला वर. मी तुला माझी पट्टराणी करीन."

द्रौपदीला जयद्रथाच्या भाषणाचा राग आला. तिनें त्याची खूप निर्भर्त्सना केली. पण त्याचा जयद्रथाच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं. तो तिला धरून नेऊं लागला. त्याचे सोबतीही द्रौपदीला पकडण्यासाठीं आले. धौम्य मुनीनें जय-द्रथाचा निषेध केला. पांडवांशीं वैर करणें हें मृत्यूला आव्हान आहे, असें त्याला त्यांनीं सांगितलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यानें बलात्कारानें द्रौपदीला आपल्या रथावर चढविली आणि रथ हांकला.

थोड्या वेळानें शिकारीचें काम संपवून पांडव आले तों त्यांना झालेली हकीकत समजली. त्याबरोबर ते जयद्रथाचा पाठलाग करण्यास निघाले. जयद्रथाचा रथ फारसा दूर गेलेला नव्हता. पांडवांनीं त्याला लगेच गांठलें. त्यांनीं त्याच्या परि-वाराचा पाडाव केला आणि द्रौपदीला सोडविली. द्रौपदी आतां हातची जाते असें पाहून जयद्रथ पळूं लागला. त्याचा भीमा-र्जुनांनीं पाठलाग करून त्याला आश्रमाकडे पकडून आणला.

त्याला भीम चांगलेंच शासन करणार होता. पण धर्मानें त्याच्यावर दया करून त्याला सोडून दिलें.

हा अपमान जयद्रथाला सहन झाला नाहीं. तो गंगेच्या तीरावर जाऊन तप करूं लागला. त्यानें शंकराची आराधना आरंभली. त्याच्या तपानें शंकर प्रसन्न झाले. पांडवांचा पराभव करण्याचें सामर्थ्य आपणास मिळावें असा त्यानें शंकराकडे वर मागितला. पण शंकरानें त्याला तसा वर कांहीं दिला नाहीं. शंकर म्हणाले, " पांडव अजिंक्य आहेत. तसा वर मला देतां येणार नाहीं. मात्र एक दिवस तूं पांडवांवर सरशी करशील असा वर तुला मी देतों. "

जयद्रथाचें तेवढ्यावरच समाधान झालें. तो परत आपल्या देशाला आला.

द्रौपदीवर आलेल्या प्रसंगामुळें धर्मराजाचें मन व्यग्र होऊन गेलें. तेव्हां मार्कंडेय मुनीनें त्याला सावित्रीचें आख्यान सांगून त्याचें सांत्वन केलें.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ... १९७७ नों. दि .......
वि. ... ... ... क्र. ..........

IRBK-0101978

IRBK-0101978

# सुलभ महाभारत

## भाग सहावा

'सुलभ महाभारत' या मालेंतून महाभारतांतील सुरस कथा क्रमाक्रमानें प्रसिद्ध होतील. विद्यार्थी, खेड्यांतील साधारण शिकलेले लोक आणि प्रौढ साक्षर यांना या कथा खचित आवडतील अशी यांची रचना केली आहे. प्रत्येक भाग आपापल्या परीनें स्वतंत्र असल्यामुळें कोणताही भाग वाचायला घेतला तरी चालेल.

पुढील भागही क्रमाक्रमानें लवकरच प्रसिद्ध होतील.

